**तक्रार अर्ज**

प्रति,  दिनांक- १२/०५/२०२६

मा. गट विकास अधिकारी साहेब,
पंचायत समिती कार्यालय, शिरपूर
ता. शिरपूर, जि. धुळे – ४२५४०५

**संदर्भ :-** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी, शिरपूर, जि. धुळे यांच्या पत्रानुसार आशा स्वयंसेविका पदासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात. भरती असल्या बाबत भरतीत लागत असणाऱ्या कागदपत्रांची मागणी करत असतांना महादेव दोंडवाडा कार्यरत सरपंच त्या भरतीस लागत असणारे ठराव देत नसल्याचे तक्रार मा. गट विकास अधिकारी साहेब,पंचायत समिती कार्यालय, शिरपूर ता. शिरपूर, जि. धुळे – ०५/०३/२०२६ रोजी आपल्या कार्यालयात लेखी तक्रार अर्ज प्रत्यक्ष

**विषय :** आशा स्वयंसेविका पदासाठी अर्ज करण्याकरिता आवश्यक ग्रामपंचायत ठराव देण्यास सरपंच व ग्रामसेवक यांनी बेकायदेशीररीत्या नकार दिल्याबाबत अनुसूचित जमाती वर कायद्या नुसार काम करणारे कर्मचारीच कायद्याचे साथ घेऊन अन्याय करत आहे त्याबाबत तक्रार.

महोदय,

सविनय विनंती अशी की, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मौजे महादेव दोंडवाडा, ता. शिरपूर, जि. धुळे येथे आशा स्वयंसेविका पदाची एक रिक्त जागा घोषित करण्यात आलेली आहे. सदर पदासाठी गावातील पात्र महिलांना अर्ज करण्यासाठी आवश्यक असलेला ग्रामपंचायत ठराव देण्यास ग्रामसेवक श्री. विजय पाटील व सरपंच सौ. संगीता किसन पावरा हे जाणीवपूर्वक नकार देत आहेत. त्यामुळे कायद्यात नुसार काम करणारे कर्मचारीच कायद्याचे साथ घेऊन अन्याय करत आहे

तसेच, सरपंच यांनी "तुम्ही कोणालाही सांगा किंवा कोणत्याही अधिकाऱ्याकडे तक्रार करा, तरीही मी ठराव देणार नाही" अशा प्रकारची धमकीवजा भाषा वापरून पूर्णपणे असंविधानिक कार्य करत आहे अर्जदारांवर मानसिक दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय, त्यांच्या जवळील व्यक्तीस सदर पदासाठी प्राधान्य मिळावे, या हेतूने इतर पात्र महिलांना अर्ज भरण्या पासून वंचित करण्यात येत आहे. व बाकी लाभार्थ्यांना धमक्यांचा बळावर भरतीस जाऊ नये असा प्रयत्न करत आहे आणि फक्त मी सांगेन तोच या भरतीस लागणार अशा प्रकारे कृत्य करत आहे, आणि या मुळे पूर्ण शिक्षित वर्ग संतापला आहे.

Received
14/5/26
Clerk to
B.D.O.P.S.Shirpur

याबाबत आपल्या कार्यालयात लेखी तक्रार अर्ज सादर केला होता. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही अथवा दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधितांकडून शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण होत असून ग्रामपंचायत पदाचा गैरवापर केला जात आहे.

तसेच, सदर तक्रार केल्याच्या कारणावरून सरपंच, ग्रामसेवक किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडून आमच्या किंवा आमच्या कुटुंबातील सदस्यांना कोणतीही धमकी, दबाव, मानसिक त्रास, शारीरिक इजा किंवा शिवीगाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यक्तींवर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**म्हणून आपणास नम्र विनंती आहे की :**

१) सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्यात यावी.

२) संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांना आपल्या कार्यालयात बोलावून पात्र महिलांना अर्ज करण्यासाठी आवश्यक ग्रामपंचायत ठराव त्वरित उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत.

३) सरपंच व ग्रामसेवक यांनी पदाचा गैरवापर केल्याबाबत त्यांच्यावर योग्य ती शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

४) आवश्यक असल्यास भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १९८, ३५१, ३५२, ११५ व ११७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

अन्यथा आम्हाला न्याय मिळविण्यासाठी पुढील कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागेल, याची कृपया नोंद घ्यावी.

धन्यवाद.

KPawara

आपली विश्वासू,

श्रीमती. काजल दीपक पावरा

Scanned with OKEN Scanner